नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०९/२०२५ ( मंगळवार )**

---

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत काढण्यात आला रूट मार्च

**पोलीस स्टेशन सावनेर :—** आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद—ए—मिलाद या सणोत्सवाचा बंदोबस्त असल्याने सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक ०२/०९/२०२५ रोजी रूट मार्च घेण्यात आला. नमुद रूट मार्च गांधी चौक, गडकरी चौक, जयस्तंभ चौक, होळी चौक, कारोकार चौक, मुरलीधर मंदिर, जामा मस्जिद, मडकी चौक, परत पोलीस स्टेशन पर्यंत या मार्गाने घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये श्री सागर खर्डे, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, श्री संपत खलाटे, उपविभागीय दंडाधिकारी, सावनेर , श्री सुमेध अलोने, मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर, पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर, यांच्यासह पोलीस स्टेशन सावनेर, पोलीस स्टेशन कळमेश्वर, पोलीस स्टेशन खापा आणि पोलीस स्टेशन केळवद येथील अधिकारी अंमलदार असे एकुण १३ अधिकारी, १ एस. आर. पी. एफ. पथक, १ आर. सी. पी. पथक, १०१ अंमलदार, २६ गृहरक्षक हजर होते.


यश कृषी सेवा केंद्र
मेन रोड, सावनेर
दुकानाकरिता
मुला-मुलींची
आवश्यकता आहे



## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध
## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दिनांक १४/०५/२०२५ रोजी अप क्र ४२२/२०२४ कलम १३७(२),१४३ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. पोलीस निरीक्षक श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखेडे,मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे त्यांनी

सदर गुन्हयाचा सखोल तपास करून दिनांक ०२/०९/२०२५ रोजी तांत्रिक पुरावे आणि गोपनिय माहीतीच्या माहीती च्या आधारे गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध घेवुन तिला नागपुर येथुन ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.

## बकरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक, ५ तासात गुन्हा उघड
## मौदा पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :—** दिनांक ०१/०९/२०२५ ते ०२/०९/२०२५ चे रात्री दरम्यान मौदा पोलीस स्टेशन हद्दितील मौजा सुकळी गावातील विकेश पुडलिक मेश्राम यांचे घरालगत असलेल्या झोपड्यातुन अज्ञात चोरट्यांनी ०९ बकऱ्या चोरी केल्याचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

मौदा पोलीसांनी सदर गुन्हयाचा तात्काळ तपास सुरू करून गुन्हे शोध पथकांने गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक ०२/०९/२०२५ रोजी अवघ्या ५ तासात सदर गुन्हयात अरोपी नामे **१) मोहित रविंद्र डाफ, रा. गुमथाळा, २) रोहित सुरेश धोटे, रा. गुमथळा, ३) दिपक राजु चंदनखेडे, रा. आवंडी ४) राजरत्न राजेंद्र वासनीक, रा. कढोली आणि एक विधिसंघर्ष ग्रस्त बालक यांना निष्पन्न केले.** नमुद आरोपीतांना विचारपुस केली असता त्यांनी मौजा सुकळी येथुन बकरी चोरी केल्याचे कबुल केले तसेच त्यांनी यापुर्वी पोलीस स्टेशन कुही हद्दीतील साळवा येथुन ५ बकऱ्या चोरी केल्याची माहीती दिली. आरोपीतांच्या ताब्यातुन मौजा सुकळी येथुन चोरी केलेल्या ९ बकऱ्या किंमती १,५५,०००/— रूपये, पोलीस स्टेशन कुही अप.क्र. ५१४/२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं गुन्ह्यातील ५ बकऱ्या किंमती. ७५,०००/— रूपये ( एकुण १४ बकऱ्या ) आणि बकरी चोरी करण्यास वापरलेली स्कॉर्पिओ क्र. एम.एच ०५ सी. एच. ०९७५ हे वाहन किंमती १२,००,०००/— असा एकुण १४,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक ०१/०९/२०२५ रोजी पारशिवणी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा अंबाझरी शिवार वनविभाग तपासणी नाका येथे नाकाबंदी केली असता हुडांई अॅसेंट कार क्रमांक एम. एच. ३२ सी. ३९३१ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात मोहाफुल गावठी दारू मिळुन आली. आरोपी चालक नामे **०१) आशूतोष संजय पवार, वय ३२ वर्ष, आणि त्याच्या सोबत दोन महीला आरोपी असे मिळुन आले**. पोलीसांनी पंचासमक्ष १) २२५ लीटर मोहाफूल गावठी दारू किंमती २२,५०० /— रूपये आणि २) हुडांई अॅसेंट कार क्रमांक एम. एच. ३२ सी. ३९३१ किंमती ५,००,०००/— रुपये असा एकुण ५,२२,५००/— रुपयेचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवणी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (अ) (ई), ८३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशी आणि विदेशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कोंढाळी**:— दिनांक ०१/०९/२०२५ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, आरोपी नामे कैलास निमदेव वाघधरे, रा. आडेगाव, ता. हिंगणा हा मौजा अडेगाव येथे नदीच्या किनाऱ्याजवळ एका टिनाच्या शेड मध्ये अवैधरीत्या देशी आणि विदेशी दारूची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा आडेगाव येथे जावुन छापा टाकला असता आरोपी **कैलास निमदेव वाघधरे, वय ४१ वर्ष, रा. आडेगाव, ता हिंगणा** हा अवैधरीत्या अवैधरीत्या देशी आणि विदेशी दारूची विक्री करीतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या ६७ निपा, किंमती ५३६०/— रूपये व विदेशी दारू मॅक डॉवेलस् नंबर १ च्या ०५ निपा किंमती ८००/रूपये ,ओसीब्लु कंपनीच्या ०५ निपा किंमती ११००/—रूपये, रोख रक्कम ३०००/— रूपये आणि इतर सहीत्य असा एकुण ११,०६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६२६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०२/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६२६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २८ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर २७ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३२ आरोपी अशा एकुण ६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण १०१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**




GAP

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०१/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०२/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री सागर खर्डे, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सावनेर टाउन, सटवा माता मंदीर, पहीलेपार, वाघोडा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार,जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. गडकरी चौक, शिवाजी चौक, गांधी चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांना तपासण्यात आले.

सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्री सागर खर्डे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले. सदर कारवाईत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकचे पोलीस अंमलदार हजर होते.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने